महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

क्र. पीआर-३/कॉस/ No 29470 दिनांक : 21 SEP 2010

वाणिज्य परिपत्रक क्र. 121

**विषय : फिरत्या पथकातर्फे विद्युत कायदा-२००३ मधील कलम १३५ व १२६ नुसार संबंधित ग्राहकाविरुध्द केलेल्या कारवाईच्या अनुषंगाने वीज देयके वितरीत करण्याबाबत.**

**संदर्भ :** १) उप दक्षता अधिकारी (अंमल) यांची कार्यालयीन टिप्पणी क्र. द.व.सु./अंमल/वीजदेयक दिनांक ०६.०८.२०१०.
२) शासनाचे परिपत्रक दिनांक ०६.०४.२००४.
३) परिपत्रक क्र. २७३१ दिनांक २९.०६.२००४ (द.व.सु)
४) वाणिज्य परिपत्रक क्र. १७ दिनांक १८.१०.२००५.
५) वाणिज्य परिपत्रक क्र. ४६ दिनांक १६.१०.२००६.
६) वाणिज्य परिपत्रक क्र. ४९ दिनांक २१.१२.२००६.
७) वाणिज्य परिपत्रक क्र. ४९ दिनांक १२.०७.२००७ ला सुधारपत्र.
८) वाणिज्य परिपत्रक क्र. ९९ दिनांक २४.०८.२००९.

-----------------

महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २६.०९.२००६ च्या अधिसूचना क्र आईए-२००६/प्र.क्र.४७७(१)/ऊर्जा-३, क्र आईए-२००६/प्र.क्र.४७७(२)/ऊर्जा-३ व क्र आईए-२००६/प्र.क्र.४७७(३)/ऊर्जा-३ व वाणिज्य परिपत्रक क्र. ४६ दि. १६.१०.२००६ अन्वये संबंधित वीज पुरवठा क्षेत्रामध्ये कलम १३५ च्या उपकलम (२) च्या खंड (अ) (ब) व (क) प्रमाणे शक्तीच्या वापर करण्यासाठी व कलम १२६ प्रमाणे शक्तींचा वापर करण्याच्या प्रयोजनार्थ "निर्धारण अधिकारी " म्हणून म.रा.वि.वि.कं.मर्यादित च्या विभिन्न अधिका-यांना प्राधिकृत केलेले आहे.

उपरोक्त विषयाच्या संदर्भातील क्र. (१) च्या कार्यालयीन टिप्पणी अन्वये उपदक्षता अधिकारी (अंमल) यांनी असे निदर्शनास आणून दिले आहे की, वीज कायदा कलम १३५ अन्वये फिरत्या पथकाने वीज चोरी उघडकीस आणून दिल्यानंतर प्रचलित पध्दतीनुसार सदर ग्राहकाचे वीज चोरीचे बील निर्धारण करुन वीज देयके तयार करण्यासाठी उप कार्यकारी अभियंता, उपविभाग यांना दिल्यानंतर सदर उप विभागाचे उप कार्यकारी अभियंता यांनी ग्राहकाची स्थळ तपासणी फिरत्या पथकाने केली असल्यामुळे वीज चोरी देयकाचे निर्धारण सुध्दा फिरत्या पथकाने करावे असे फिरत्या पथकाला कळविले आहे. त्या अनुषंगाने खालील सुचना निर्देशित करण्यात येत आहेत.

१) शासनाच्या अधिसुचनाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारा अंतर्गत ज्या अधिका-याने कलम १२६ किंवा कलम १३५ लावण्याचे प्रस्तावित केले आहे. तो कलम १२६ अंतर्गत तात्पुरते मुल्य निर्धारण देयक तसेच अंतीम मुल्य निर्धारण देयक अदा करेल व तसेच कलम १३५ अंतर्गत वीजचोरीचे मुल्य निर्धारण देयक अदा करेल

२) जर फिरत्या पथकामार्फत कलम १२६ किंवा कलम १३५ लावण्याचे प्रस्तावित केले असेल तर संबंधीत क्षेत्रिय Billing Authority ने आवश्यक ते सहकार्य फिरत्या पथकास द्यावे. जेणेकरुन संबंधीत फिरते पथकाच्या अधिका-यांस कायदयातील तरतुदीनुसार बिल त्वरीत तयार करुन संबंधीत ग्राहकास देता येईल.

३) अशा बिलांची प्रत निश्चितपणे संबंधीत मंडळ कार्यालय / उपविभाग तथा शाखा कार्यालयांना आवश्यक त्या नोंदी ग्राहकाच्या लेजर / नोंद वहीत घेण्यासाठी देण्यात यावी.

४) सक्षम न्यायालयाकडून अंतीम निराकरण / निर्णय होईपर्यत सदर प्रकरणाचे बाबतीत ज्या अधिका-याने संबंधित कलम लावण्याचे प्रस्तावित केले आहे ते पुढील कार्यवाही करतील.

सर्व क्षेत्रिय अधिका-यांना सुचित करण्यात येते की, वर दिलेल्या निदर्शनाचे तंतोतंत पालन करावे.

नरेंद्रसिंह नारन.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

प्रत : प्रेषण यादीप्रमाणे

C:\ssv(EE-१)\Kalam १३५ & १२६ ८.९.२०१०.doc